दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २१८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.८ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

मशाल घेऊन राहुल गांधींची महाराष्ट्रात हजेरी

नांदेड । वृत्तसंस्था

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेचे रात्री ९ वाजता महाराष्ट्रात आगमन झालं, नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथे हाती मशाल घेऊन राहुल गांधींनी हजारो कार्यकर्त्यांसह महाराष्ट्रात पाऊल ठेवलं. राहुल गांधींच्या स्वागतासाठी काँग्रेसचे दिग्गज नेते उपस्थित होते. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यासह अनेक नेत्यांनी राहुल गांधींचं स्वागत केलं. देगलूरमध्ये येताच राहुल गांधींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केलं.

काँग्रेससह विविध राजकीय पक्ष, संघटनांकडून 'भारत जोडो' यात्रेचे स्वागत केले जात आहे. महाराष्ट्रात आज रात्री ९ वाजता पदयात्रा प्रारंभ होऊन वन्नाळीकडे प्रयाण करण्यात आली. यावेळी हातात मशाली घेऊन मशाल यात्रा काढण्यात आली असून परिवर्तनाची मशाल असल्याचं काँग्रेसने म्हटले आहे. राहुल गांधींचं मोठ्या जल्लोषात देगलूर येथे स्वागत झालं.

रायगड नगरीच्या दणक्यानंतर....

पनवेल प्रांतांच्या हेराफेरीची खातेनिहाय चौकशी सुरू

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल-उरणचे प्रांत यांनी माहितीच्या अधिकाराखाली रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार यांनी मागितलेली माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे वृत्त दैनिक रायगड नगरीने भाग १, २, ३ मध्ये प्रकाशित केले होते. त्याची दखल नवनिर्वाचित सरकारने घेवून पनवेल प्रांतांच्या भांडाफोडीची चौकशी सुरू केले असल्याचे खात्रीलायक वृत्त दै.रायगड नगरीच्या हाती आले आहे.

पनवेल प्रांतांनी जमिनीच्या व्यवहारात शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसून धनदांडग्यांची उखळे पांढरी केलेली आहेत व त्या बदल्यात मोठ्या प्रमाणात आपले हात ओले केल्याचा संशय शेतकरी वर्गाकडून व्यक्त केला जात होता. पनवेल-उरण तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष भेटून दुरध्वनीद्वारे आणि पत्राद्वारे दै.रायगड नगरीच्या मुख्य संपादकांना एक वर्षात केलेल्या भ्रष्टाचाराची आपण सखोल

भाग-४

भाग ५ उद्याच्या अंकी

चौकशी केल्याची मागणी रास्त असून त्यामुळे दै.रायगड नगरीचे अभिनंदन करण्यात आले आहे. नव्या सरकारचे महसूलमंत्री यांच्या कार्यालयाकडून विशेष पथक नेमण्यात आले असल्याचे खात्रीलायक वृत्त असून हे पथक माजी मंत्र्यांच्या जवळीक असलेल्या पनवेल प्रांतांची सखोल चौकशी करणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. त्यामुळे पनवेल प्रांत कार्यालयातील दलालांचेही धाबे दणाणले आहेत.

पनवेल प्रांत कार्यालयात हेराफेरी करण्यासाठी प्रांतांनी मोठ्या प्रमाणात दलाल उभे केले असल्याचे खात्रीलायक वृत्त असून या दलालांमार्फतच आर्थिक व्यवहार केले जात असल्याचा संशय शेतकरी वर्गाकडून व्यक्त केला जात आहे म्हणून ही चौकशी सखोल होवून भ्रष्टाचाराने बरबटलेल्या पनवेल-उरण प्रांतांची खातेनिहाय चौकशी बरोबरच सीबीआय, लाचलुचपत खात्याकडून सखोल चौकशी होणे जरुरीचे आहे, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय; १० टक्के आर्थिक आरक्षणावर शिक्कामोर्तब

नवीदिल्ली । वृत्तसंस्था

आर्थिक दुर्बल घटकांना नोकरी आणि प्रवेशांसाठी देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदिल दिला आहे. १०३व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून ही करण्यात आलेली आरक्षणाची तरतूद वैध असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने हा ऐतिहासिक निकाल दिला आहे. सरन्यायाधीश उदय लळीत यांच्या अध्यक्षतेखाली घटनापीठाने हा निकाल दिला आहे. केंद्र सरकारने १०३वी घटनादुरुस्ती करुन सवर्ण प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना आरक्षणाची तरतूद केली होती. पाच न्यायमूर्तींपैकी तीन न्यायमूर्तींची सहमती होती तर दोन न्यायमूर्ती असहमत होते. सुप्रीम कोर्टाच्या या निकालामुळं देशभरात आर्थिक आरक्षण लागू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना समाजात सन्मानाने जगता यावे आणि त्यांना शिक्षण आणि नोकरीची संधी प्राप्त व्हावी, यासाठी या घटकाला १० टक्के आरक्षण देण्यासाठी केंद्र सरकारने आरक्षणाची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर देशात आर्थिकदृष्ट्या मागासांनादेखील आरक्षण देण्याची मागणी करण्यात येत होती. मात्र, केंद्र सरकारच्या या निर्णयाविरोधात जवळपास ४० याचिका दाखल करण्यात आल्या होत्या.

न्या. उदय लळीत यांनी सरन्यायाधीशपदाची धुरा हाती घेतल्यानंतर या प्रकरणावर तातडीने घटनापीठासमोर सुनावणी घेतली होती. उदय लळीत यांच्या कामकाजाचा आज शेवटचा दिवसही आहे. त्यामुळं आरक्षणाच्या निकालाकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले होते. सर्वोच्च न्यायालयाने आर्थिक दुर्बल घटकांचे १० टक्के आरक्षण कायम राखण्याचा निकाल दिला आहे.

सरन्यायाधीश उदय लळीत, न्यायमूर्ती दिनेश माहेश्वरी, न्यायमूर्ती रविंद्र भट्ट, न्यायमूर्ती बेला एम त्रिवेदी आणि जेबी पारदीवाला यांच्या घटनापीठाने आरक्षणावर निकाल सुनावला आहे.

चारही न्यायमूर्तींपैकी तीघांनी निकाल आरक्षणाच्या बाजूने दिला आहे. तर, सरन्यायाधीश उदय लळित यांच्यासह आणखी एका न्यायमूर्तीने आर्थिक आरक्षणाच्या तरतूदीला विरोध केला आहे.

सिडकोची गृहनिर्माण क्षेत्रातील यशाची पुनरावृत्ती

महागृहनिर्माण योजनेतील ७०० स्लॅबचे काम ५५५ दिवसांत केले पूर्ण

दै.रायगड नगरी । नवी मुंबई

नवी मुंबईतील तळोजा नोडमधील सेक्टर-२८,२९,३१ व ३७ मध्ये साकारण्यात येत असलेल्या महागृहनिर्माण योजनेतील इमारतींमधील ५०० स्लॅबचे काम ४८९ दिवसांत पूर्ण केल्यानंतर, सिडको महामंडळाने पुन्हा एकदा डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या मार्गदर्शनाखाली याच इमारतींमधील ७०० स्लॅबचे काम केवळ ५५५ दिवसांत पूर्ण करून गृहनिर्माण क्षेत्रातील आपल्याच यशाची पुनरावृत्ती केली आहे.

सिडकोतर्फे नवी मुंबईतील विविध नोडमध्ये ६७,००० घरांच्या (सदनिका) बांधणीचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दिशेने सिडकोची वेगाने वाटचाल सुरू आहे. परिहवन केंद्रित विकास संकल्पनेवर आधारित या गृहनिर्माण योजनेतील घरांचे बांधकाम रेल्वे स्थानक फोरकोर्ट, बस व ट्रक टर्मिनल परिसरात करण्यात येत आहे. यामुळे प्रवासाच्या वेळेत बचत होण्यासह सार्वजनिक वाहतुकीच्या वापरासही प्रोत्साहन मिळणार आहे.

महागृहनिर्माण योजने अंतर्गत तळोजा नोडमधील सेक्टर-२८,२९,३१ व ३७ मध्ये विकसित करण्यात येत असलेल्या इमारतींमधील ७०० स्लॅबचे काम केवळ ५५५ दिवसांत पूर्ण करण्यात आले आहे. दिवसाला सरासरी १.२६ स्लॅब या विक्रमी वेगाने हे काम पूर्ण करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता सिडकोने ही कामगिरी पार पाडली आहे. सिडकोतील नियोजनकार व अभियंते, प्रकल्प सल्लागार टीसीई-एचएसए, एएचसी, कंत्राटदार बीजीएस न्ड कं. यांनी डॉ. संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी पार पाडली आहे.

या कामगिरीद्वारे सिडकोने गृहनिर्माणातील आपल्या यशाची पुनरावृत्ती केली आहे. सिडकोचे हे यश परवडणाऱ्या दरातील घरांच्या क्षेत्रातील एक सकारात्मक घडामोड आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या परवडणाऱ्या दरातील घरांचे स्वप्न कमी कालावधीत पूर्ण करण्याच्या दिशेने पडलेले हे आशादायी पाऊल आहे.

> परवडणाऱ्या दरातील घरांचे बांधकाम नियोजित कालावधीत पूर्ण करण्याचे सिडकोचे उद्दिष्ट आहे. यासाठी गुणवत्तेशी कोणतेही तडजोड न करता, घरांचे बांधकाम वेगाने पार पाडण्याकरिता बांधकाम क्षेत्रातील प्रगत आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर सिडकोचा भर आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्नही वेळेत पूर्ण होणार आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

मेरा लाल मुझे लौटा दो : उरण नौदलाच्या बेपत्ता मुलासाठी मातेचा टाहो

दै.रायगड नगरी । उरण

करंजा -उरण नौदल शस्त्रागारातील आयएनए-अभिमन्युमध्ये सेफ म्हणून काम करणारा २२ वर्षीय जवान नौदल अधिकारी विशाल महेश कुमार हा ३ नोव्हेंबरपासून अचानक बेपत्ता झाला आहे. शोध घेण्यात पोलिस, नौदल विभागाच्या अधिकाऱ्यांकडूनही मागील पाच दिवसांपासून अक्षम्य दिरंगाई होत असल्याने जैसा कैसा ही हो मेरा लाल मुझे वापस लौटा दो अशी आर्त साद मातेने पोलिस, नौदलाला घातली आहे.

उत्तरप्रदेशातील बागपत जिल्ह्यातील धपरौली गावातील विशाल महेश कुमार (२२) हा जवान १९ महिन्यांपूर्वी उरण- करंजा येथील नौदलाच्या सेवेत दाखल झाला होता. नौदल शस्त्रागारातीलआयएनए-अभिमन्युमध्ये सेफ म्हणून काम करणारा जवान अधिकारी ३ नोव्हेंबरपासून बेपत्ता झाला आहे. त्यामुळे नौदल अधिकाऱ्यांनी विशालच्या आईवडीलांना तत्काळ बोलावून घेतले. मुलाच्या बेपत्ता होण्याच्या वृत्ताने बैचेन झालेली आई मधु व वडील महेश कुमार आपल्या दुसऱ्या लहान मुलासह मुंबई गाठण्यासाठी विमानाची तिकिटे बुक केली. मात्र विमानतळावर वेळेवर पोहचता आले नसल्याने विमान सुटले. मात्र दुसरे विमान विलंबाने सुटणार असल्याने धीर सुटलेल्या आईवडीलांनी बागपत ते उरण हे ३५०० किमी ३६ तासांचे अंतर खासगी भाड्याच्या कारने पार करून उरण गाठले.

इथे पोहोचल्यावर नौदल अधिकाऱ्यांनी विशालच्या बेपत्ता होण्याची पोलिसात साधी तक्रारही दाखल केली नसल्याचे निदर्शनास आले. नौदलाच्या प्रोटोकॉल प्रमाणे सात दिवसांनंतर

◀ .../२

कामगार मोर्चाच्यावतीने 'धन्यवाद मोदीजी अभियान'

दै.रायगड नगरी । पनवेल

कामगार मोर्चाच्यावतीने 'धन्यवाद मोदीजी अभियान' राबवुन पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील १४ जिल्हयाचा ८ दिवस प्रवास यात्रेचा पहिला टप्पा रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात भाजप कामगार मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश ताठे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी लाभार्थी व पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवा, महिला, कामगार, शेतकरी, यांच्यासाठी राबविलेल्या शेकडो कल्याणकारी योजनांमुळे करोडो देशवासीयांच्या जीवनात आमुलाग्र बदल झाला. या कल्याणकारी योजनांची माहिती सर्वांना देणे व त्या माध्यमातून मोदीजींना धन्यवाद देणे, यासाठी भा. ज.पा. कामगार मोर्चा महाराष्ट्र प्रदेशातर्फे प्रदेश अध्यक्ष गणेश ताठे यांनी हे अभियान चालविले आहे. १४ जिल्ह्यात प्रवास करून हि यात्रा काल रायगडमध्ये आली.

रविवारी सायंकाळी पळस्पा फाटा येथे कामगार मोर्चाचे रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी शेकडो कार्यकर्ते व कामगारांसमवेत गणेश ताठे व प्रदेश पदाधिकारी यांचे जोरदार स्वागत केले. त्यानंतर पनवेल येथील छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून महाराजांना अभिवादन करण्यात आले. तद्नंतर मिरवणुकीने पनवेल मधील भा.ज.पा. मध्यवर्ती कार्यालयात जाऊन तेथे सभा घेण्यात आली.कामगार नेते जितेंद्र घरत यांनी आपल्या स्वागतपर भाषणात जिल्हयातील कामाचा आढावा घेताना योजना जिल्हयात कशाप्रकारे राबविण्यात आल्या यांची माहिती देऊन जिल्ह्यातील कामगारांचे प्रश्न मान्यवरांपुढे मांडले.

गणेश ताठे यांनी आपल्या भाषणात, मोदीजींनी राबविलेल्या योजनांची माहिती देऊन कामगार कायदे व त्यामुळे होणारा कामगारांचा फायदा यांची माहिती देऊन कामगारांच्या कोणत्याही प्रश्नाला न्याय आम्ही देवू असे अभिवचन त्यांनी दिले. या कार्यक्रमात गणेश ताठे यांनी जितेंद्र घरत यांना महाराष्ट्र प्रदेश कार्यकारीणीत चिटणीस पदी घेत असल्याचे व कोकण विभागाची जबाबदारी देण्यात येत असल्याचे घोषित केले.

◀ .../२

मुरुड तालुक्यात भटक्या कुत्र्यांची वाढती दहशत

वाहनचालक, पर्यटक व मॉर्निंग वॉकला जाणारे नागरिक हैराण

दै.रायगड नगरी । कोर्लई

मुरुड तालुक्यात अनेक ठिकाणी तसेच समुद्र किना-यावर गेल्या अनेक दिवसांपासून विशेष करून सकाळच्या वेळेत भटक्या कुत्र्यांची वाढती दहशत मागील आठवड्यात तीन जणांवर हल्ला करून जखमी केल्याची घटना घडली आहे. भटके कुत्रे पर्यटक व नागरिकांची डोकेदुखी ठरत असून याकडे शासनाच्या संबंधित तसेच नगरपरिषदेच्या असलेल्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त होत असून योग्य ती उपाययोजना करण्यात यावी. अशी मागणी नागरिकांतून जोर धरीत आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून मुरुड तालुका तसेच समुद्र किनारी सकाळच्या वेळेत भटके कुत्रे टोळक्याने फिरताना दिसतात.त्यामुळे सकाळच्या वेळेत समुद्र किनारी फिरायला (मॉर्निंग वॉकला)जाणा-या नागरिकांची व पर्यटकांची डोकेदुखी ठरत आहे.यापुर्वी देखील मुरुड मध्ये श्वानदंशाच्या अनेक घटना घडल्या आहेत.

नुकत्याच नांदगाव मध्ये तीन जणांना तर मुरुड मध्ये देखील तीन जणांना श्वानदंश झाल्याच्या घटना ताज्या असून समुद्रकिनारी भटक्या कुत्र्यांची दहशत निर्माण झाली असून अजूनही वेळप्रसंगी कोणत्याही क्षणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.यासाठी प्राणी मित्र संघटना , विविध सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन तसेच शासनाच्या आरोग्य खात्याने व संबंधित नगरपरिषद व ग्रामपंचायत यांनी यात लक्ष पुरवून योग्य ती उपाययोजना करण्यात यावी. अशी मागणी नागरिकांतून जोर धरीत आहे.

‘अंधेरी’तील मशाल!

आज काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची ‘भारत जोडो’ पदयात्रा महाराष्ट्रात प्रवेश करीत असताना पूर्व अंधेरी मतदारसंघात शिवसेनेच्या ठाकरे गटाला आणि पर्यायाने महाविकास आघाडीला विजय मिळाला आहे. शिवसेनेचे आमदार रमेश लटके यांच्या निधनामुळे झालेल्या या पोटनिवडणुकीतून भारतीय जनता पक्षाने माघार घेतली होती. अशी माघार घेऊन ‘नोटा’ (नॉन ऑफ द अबोव्ह) या पर्यायाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. त्यामुळेच, ‘नोटा’ने विक्रम केला आहे. लोकशाहीच्या शिक्षणाच्या दृष्टीने हे चांगले झाले. पुढेही मतदारांनी हा पर्याय लक्षात ठेवायला हरकत नाही. भाजप या स्पर्धेत नसला तरी ठाकरे गटाच्या विजयाला दोन कारणांसाठी महत्त्व आहे. पहिले म्हणजे, शिवसेनेतील अभूतपूर्व बंडानंतर शिवसेना पुन्हा एकदा उभी राहू शकते का, हा सवाल होता. अंधेरीत शिवसेनेचे कार्यकर्ते, नेते आणि मतदार हा मोठा झटका मागे सारून उभे राहिलेले दिसले. याचबरोबर, शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्हही गेले आहे. ‘मशाल’ हे नवे चिन्ह रुजविण्याची ही पहिलीच संधी होती. नवी, आधुनिक माध्यमे आली असली तरी नवे चिन्ह मतदारांपर्यंत पोहोचविणे, हे एक आव्हानच असते. ते ठाकरे गटाने यशस्वी केल्याचे या निकालावरून दिसते आहे. या मतदारसंघात अतिशय कमी मतदान झाले होते. तसेच, प्रबळ विरोधक नसल्याने खऱ्या अर्थाने लढाई झालेली नाही. तेव्हा, केवळ या एकाच निकालावरून मुंबई महापालिकेच्या निकालांबाबत आजच कयास बांधणे अवघड आहे. मात्र, महाविकास आघाडी अजून एकत्रित कोणतीही मोठी निवडणूक लढलेली नाही. महापालिकांच्या निमित्ताने ती संधी पहिल्यांदा मिळणार आहे. तेव्हा काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचा ठाकरे गट यांच्या मतांची बेरीज होऊ शकते का किंवा मुस्लिम मतदार शिवसेनेचा समावेश असणाऱ्या या आघाडीला आपलेसे मानतात का, या प्रश्नांची उत्तरेही महत्त्वाची ठरणार आहेत. ऋतुजा लटके यांना मिळालेल्या मतांचे तपशीलवार पृथक्करण केल्यानंतर या तिघांची बेरीज अंधेरीत झाली का, याचा वेध घेता येईल. मात्र, या विजयाबद्दल उद्धव ठाकरे आणि या निवडणुकीची जबाबदारी असणारे अनिल परब यांचे अभिनंदन करायला हवे. या विजयातून मिळणारे मनोबळ पुढच्या निवडणुकांमध्ये उपयोगी पडेल. खरेतर, अंधेरीची निवडणूक शिंदे गटाला लढवायचीच नव्हती तर चिन्हाचा वाद इतक्या तातडीने पराकोटीला जाण्याचे तसे काही कारण नव्हते. मात्र, तसा तो गेला. त्याचप्रमाणे, लटके यांनी महापालिकेच्या सेवेतून मुक्त करण्यातही विलंब झाला. इतके होऊनही भाजपने उमेदवारच ऐनवेळी मागे घ्यावा, हे गौडबंगालच होते. खरेतर, मुंबईतील मूळ शिवसेनेचा नेमका किती मतदार शिंदे गटाकडे सरकला आहे, याचा थोडासा अंदाज भाजप-शिंदे गटाने निवडणूक लढविली असती तर आला असता. भाजपने ही ‘झाकली मूठ सव्वा लाखाची’ ठेवण्यात पक्षातील अंतर्गत कुरघोडीचे राजकारण होते की ठाकरे गटाच्या संभाव्य विजयाची झळाळी निस्तेज करण्याची खेळी होती, याची चर्चा होत राहील. मात्र, हा सामना शिवसेना आणि भाजप असा झालाच असता आणि हाच निकाल लागला असता तर शिवसेनेची ताकद कितीतरी वाढली असती. यंदाची मुंबई महापालिकेची निवडणूक ही ठाकरे गट आणि भाजप या दोघांसाठीही कमालीची महत्त्वाची आहे. ठाकरे गटासाठी तर ती निर्णायकच आहे. उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री झाल्यापासून मराठी ते हिंदुत्व आणि त्यानंतर मुस्लिमांसहित सगळ्यांनाच सोबत घेऊन जाण्यापर्यंत समावेशक होत गेले आहेत. त्यांची ही नवी सर्वसमावेशकता मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत कशी फळते, हे पाहावे लागेल. मात्र, काही दिवसांपूर्वी अमित शहा यांनी जी विधाने केली; त्यावरून मुंबई तसेच इतर महापालिकांच्या निवडणुका किती चुरशीच्या होतील, याची कल्पना येते. अंधेरी जिंकली म्हणजे पुढचा सारा प्रवास सोपा झाला, असे नाही. येत्या तीन महिन्यांत मुंबई महापालिकेची निवडणूक झालीच तर खरी लढाई होईल. त्या लढाईची चांगली तयारी शिवसेनेने अंधेरीत केली आहे. महाराष्ट्रात भाजपने पोटनिवडणुकीतून अशी माघार घेतली असली तरी देशातील इतर सहापैकी चार पोटनिवडणुका जिंकून भाजपने आपले वर्चस्व दाखवून दिले आहे. बिहारमधील गोपाळगंज येथील निवडणूक भाजपच्या दृष्टीने महत्त्वाची होती. नितीशकुमार यांनी साथ सोडूनही भाजपने ही जागा राखली. मात्र, मोकामा ही जागा लालूप्रसाद यांच्या राष्ट्रीय जनता दलाने राखली आहे. उडिशात भाजप आमदाराच्या निधनाने पोटनिवडणूक झाली असली तरी धामनगर मतदारसंघात भाजपने चांगला विजय मिळवला आहे. तेलंगणातही टीआरएस जिंकला असला तरी तेथेही लढत जोरदार झाली. भाजपच्या विरोधात सारे विरोधक एकत्र येतात का, याच प्रश्नाची चर्चा या निकालांनंतर पुन्हा सुरू होणार आहे. राहुल गांधी यांच्या पदयात्रेत उद्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांचे पक्षप्रमुख सहभागी झाले; तरच अंधेरी निवडणुकीच्या निकालाचे पाऊल पुढे पडले, असे मानता येईल.

प्रकल्पग्रस्तांना हॉकर्स झोन आरक्षित भूखंड द्या: भरत पाटील

दै.रायगड नगरी । कळंबोली

पनवेल महापालिका क्षेत्रात विविध व्यवसायिक क्षेत्रामध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य न देता परप्रांतीय व्यावसायिक कुशल व अकुशल कामगार आणून काम करून घेतले जाते .त्यामुळे येथील स्थानिक प्रकल्पग्रस्तांची व्यवसाय अभावी बरीच उपस्मार होत आहे. पनवेल महापालिकेकडून विविध ठिकाणी हॉकर झोनची निर्मिती केलेली आहे .या झोनमध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्त बांधवांना हक्काची व्यवसाय करण्यासाठी जागा उपलब्ध व्हावी अशी मागणी शिवशक्ती फेरीवाला संघाचे अध्यक्ष भरत बुधाजी पाटील यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

सिडको निर्मित वसाहती निर्माण करण्यासाठी पनवेल परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या मोलाच्या शेतजमिनी कवडीमोल भावात घेऊन फार मोठे योगदान दिलेले आहे. या भागातील नागरीकरण जसजसे वाढत गेले तस तसे येथील स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे व्यवसायावरही गदा आली. मात्र नागरिकरणामध्ये निर्मिती झालेले अनेक विविध व्यवसाय यामध्ये तेथील व्यावसायिक मालक स्थानिक प्रकल्पग्रस्त बांधवांना रोजगार न देता ते पर प्रांतातून विविध प्रकारचे कामगार आणून त्यांची कामे करून घेत आहेत. त्यामुळे स्थानिक प्रकल्पग्रस्तांनवर आता उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. याकरता पनवेल, कळंबोली ,कामोठा, खारघर , नवी पनवेल या भागात सिडको व महापालिकेने निर्माण केलेले जे हॉकर्स झोन आहेत त्यामध्ये प्रकल्पग्रस्त स्थानिक बांधवांना हक्काची जागा मिळण्यासाठी पुढाकार घ्यावा यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे शिवशक्ती फेरीवाला संघाचे अध्यक्ष भरत बूधाजी पाटील यांनी एका लेखी पत्राने महापालिका व सिडकोला जागे केले आहे. याबाबत जर गांभीर्याने विचार केला नाही तर जनआंदोलन उभारून प्रशासनाला जागे करण्यात येईल असा इशाराही त्यांनी दिला आहे. प्रकल्पग्रस्त बांधवांना हक्काची जागा मिळवून व्यवसाय करून आपल्या कुटुंबीयांचे पालन पोषण करणे महत्त्वाचे असल्याने महापालिकेने या मागणीचा गांभीर्याने विचार करावा अशी मागणी भरत पाटील यांनी केली आहे.

रिजवाना सय्यद यांना आंतरराष्ट्रीय हिंदी ‘भाषा भुषण’पुरस्काराने सन्मानित

दै.रायगड नगरी । म्हसळा

अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूल व ज्युनि.कॉलेज म्हसळाच्या हिंदी,मराठी भाषा विषयाच्या शिक्षिका रिजवाना असिफ सय्यद यांनी विश्वस्तरीय हिंदी भाषा विकास,प्रचार,संवर्धन आणि अनुसंधान कार्यात काम करताना त्यांनी साहित्य आणि शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले असल्याने त्यांना सन २०२२ मधील आंतरराष्ट्रीय हिंदी भाषाभुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.दिनांक १ ऑक्टोंबर २०२२ रोजी काठमांडो-नेपाल येथे संपन्न झालेल्या नेपाल-भारत हिंदी शिक्षक व साहित्यकार संमेलनाचे भव्य कार्यक्रमात श्रीमती रिजवाना सय्यद यांना संमेलन समिती प्रमुख विजयकुमार तिवारी,केंद्रीय समन्वयक उस्मान मुलानी,स्वागताध्यक्षा नेपाल डॉ. संगीता ठाकुर,प्रमुख संयोजक कैलास जाधव,प्रमुख संयोजक नेपाल डॉ.राधेशाम ठाकुर यांचे हस्ते आंतरराष्ट्रीय हिंदी भाषाभुषण पुरस्कार देऊन येथोचित सन्मानित करण्यात आले.अंजुमन हायस्कूलच्या शिक्षिका प्रा.रिजवाना सय्यद यांचे हिंदी,मराठी,उर्दु आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आसुन त्यांचे मराठी आणि हिंदी भाषेतील अनेक प्रकारचे लेखन साहित्य प्रसिद्ध आहे.साहित्य क्षेत्रात सातत्यपुर्ण उल्लेखनीय कामगिरी बजावत अंजुमन हायस्कूल म्हसळाच्या महीला शिक्षिका रिजवाना असिफ सय्यद यांचे कार्याची राष्ट्रियस्तरावर दखल घेत त्यांना हिंदी भाषाभुषण पुरस्काराने गौरविण्यात आले असल्याने त्यांचे स्थानीक स्कूल कमिटी चेअरमन नासीर मिठागरे,माजी चेअरमन फझलभाई हळदे,सर्व संचालक मंडळ, प्राचार्य महंमद तांबे,शिक्षक,पालक विध्यार्थी आणि म्हसळा तालुक्यात सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

मेरा लाल मुझे लौटा दो : उरण नौदलाच्या बेपत्ता मुलासाठी मातेचा टाहो

तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. नौदल अधिकाऱ्यांच्या या अजब व्यक्तव्याने संभ्रमात सापडलेल्या आईवडीलांनी अखेर नौदलाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने उरण पोलिस ठाण्यात ६ नोव्हेंबर रोजी विशाल बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली.मात्र बेपत्ता होण्याच्या तक्रारीनंतरही नौदल, पोलिस अधिकारी विशालचा शोध घेण्यात दिरंगाई करीत असल्याचा आरोप आईवडील व भावांनी पत्रकारांशी बोलताना केला आहे.

पोलिस, नौदल अधिकारी बेपत्ता विशालचा शोध घेण्यात दिरंगाई करीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी स्वतःहून चौकशी सुरू केली. मित्र व सहकाऱ्यांकडे चौकशी केली असता विशाल हा ३ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.०२ ते १०.५६ वाजेपर्यंत उरण नगरपरिषदेच्या बाळासाहेब ठाकरे स्विमिंग पूलात पोहण्यासाठी गेला असल्याचे तेथील सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून आले आहे. मात्र येथील रजिस्टरमध्ये येण्याजाण्याबाबत कोणत्याही नोंदी आढळून आलेल्या नाहीत. तसेच ३ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजताचे विशालचे शेवटचे मोबाईल लोकेशन पनवेल रेल्वे स्टेशन आले असल्याची माहिती आईवडीलांनी पत्रकारांशी बोलताना दिली.आईवडील व चुलत भाऊ अमन भटनागर यांनी चौकशीत मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास करण्याची विनंती पोलिसांना केली आहे.मात्र पोलिसही सहकार्य करण्यास उत्सुक नसल्याचा आरोप आई-वडीलांनी केला आहे.उलट विशाल मित्र व एका नौदल अधिकाऱ्याला वरिष्ठांनी सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले असून त्यामुळे परिस्थिती संशयास्पद स्थितीत येऊन ठेपली असुन नौदल अधिकारी काही तरी लपवित असल्याचा आरोप विशालच्या आईवडीलांनी पत्रकारांशी बोलताना केला आहे.पोलिस, नौदलाच्या अधिकाऱ्यांनी निःपक्षपाती चौकशी सुरू न केल्यास या संशयित प्रकरणाची सीआयडी, सीबीआय मार्फत चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.बेपत्ता मुलाचा शोध घेण्यात आणखी दिरंगाई केल्यास पोलिस ठाण्यासमोरच कुटुंबियांसह आत्मदहनाचा इशाराही हताश झालेल्या आईवडीलांनी पत्रकारांशी बोलताना दिला आहे.

पोलिस,नौदल विभागाच्या अधिकाऱ्यांकडूनही मागील पाच दिवसांपासून अक्षम्य दिरंगाई होत आहे. मात्र जैसा कैसा ही हो मेरा लाल मुझे वापस लौटा दो अशी आर्त साद मातेने पोलिस, नौदलाला पत्रकारांसमोरच घातली आहे.नौदलाच्या बेसकम्पमधून एक ऑफिसर बाहेर येतो आणि बेपत्ता होतो, यावर नौदलाकडून कोणतीही कारवाई करण्यात होत नाही. हे सगळं संशयास्पद असल्याचं आईवडिलांचे म्हणणे आहे.

कामगार मोर्चाच्यावतीने ‘धन्यवाद मोदीजी अभियान’

बहारदार व जोशपूर्ण झालेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रायगडचे सरचिटणीस ज्ञानेश्वर साखरे यांनी केले तर आभार प्रदर्शन रविंद्र कोरडे यांनी केले. या दौ-यात प्रदेश कार्यकारीणीतील प्रदेश सरचिटणीस प्रमोद जाधव, हनुमंत लांडगे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत महाडीक विनोद शहा, प्रदेश सदस्य मंगेश चव्हाण सदस्य उपस्थित होते.

याशिवाय जिल्ह्यातील पदाधिकारी समिरा चव्हाण, चित्रपट कामगार आघाडी रायगड जिल्हा अध्यक्षा नेत्रा राणे, उपाध्यक्ष अरुण घोडके, चिटणीस जगदीश म्हात्रे, संतोष घरत, अल्ताफ शेख, रविंद्र पाटील, अनिल कर्णूक, चंद्रकांत कडू, पंढरीनाथ दरेकर, तसेच तळोजा एम.आय.डी.सी. मधील डाऊ केमिकल, हायकल लिमिटेड कंपनी, बाल्मर लॉरी, केमस्केप केमिकल, खोपोली येथील हर्क्युलस होईस्ट, पाताळगंगा मधील इदेमित्स्यु ल्युब इंडिया, आष्टे लॉजिस्टिक, गती के. डब्ल्यू ई, उरण मधील आ.व. टी. एल. आदी कंपनीमधील कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवी मुंबईतील शीतगृहांवर कारवाई ; २९ कोटींचा माल जप्त

दै.रायगड नगरी । नवी मुंबई

विविध देशांतून आयात केलेल्या खाद्यपदार्थांचा दर्जा अन्न व सुरक्षा मानकांप्रमाणे न आढळल्याने अन्न व औषध प्रशासनाने नवी मुंबईतील शीतगृहांवर कारवाई करून २९ कोटींचा माल जप्त केला आहे. आतापर्यंतही ही सर्वात मोठी कारवाई असल्याचे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त अभिमन्यू काळे यांनी सांगितले.

सध्या परदेशांतून आयात केलेले खाद्यपदार्थ वापरण्याचे प्रमाण वाढले आहे. मात्र हे खाद्यपदार्थ आयात केल्यानंतर ते ज्या शीतगृहात ठेवले जातात तेथे काळजी घेत नसल्यामुळे दर्जाबाबतच्या तक्रारी अन्न व औषध प्रशासनमंत्री संजय राठोड यांच्याकडे आल्या होत्या. या तक्रारींची शहानिशा केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

तुर्भे येथील मे. सावला फूडस् ॲण्ड कोल्ड स्टोरेजवर अन्न व सुरक्षा विभागाच्या अधिकार्यांनी अचानक धाड टाकली. त्यावेळी या धाडीत अनेक आक्षेपार्ह बाबी आढळून आल्या. आयात केलेल्या खाद्यपदार्थाच्या दर्जाबद्दलच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तूर्तास ३५ नमुने चाचणीसाठी ताब्यात घेण्यात आले आहेत, असे राठोड यांनी सांगितले.

आतापर्यंत इतक्या मोठ्या प्रमाणात माल जप्त करण्याची ही पहिलीच कारवाई असल्याचेही राठोड यांनी स्पष्ट केले. परदेशातून येणार्या खाद्यपदार्थाचा दर्जा राखला जावा, यासाठी आता राज्यभरात ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या शीतगृहात उंदीर, झुरळांचे साम्राज्य होते. याशिवाय आयात केलेल्या खाद्यपदार्थावर मूळ देशाच्या नावाचाही उल्लेख नव्हता. संबंधित खाद्यपदार्थ कधी पाठविण्यात आले तसेच या खाद्यपदार्थ वापरण्याची अंतिम मुदत काय आहे आदी अन्न व सुरक्षा मानकांनुसार काळजीही घेतली गेली नसल्याचे आढळून आले.

अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ नुसार परवाने घेतले नसल्याची गंभीर बाब आढळून आली आहे. याबाबत आवश्यक ती पूर्तता करण्यास शीतगृहांना सांगण्यात येणार असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. तपासणीसाठी घेतलेल्या नमुन्यात संबंधित खाद्यपदार्थ जीवितास घातक आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध थेट न्यायालयात खटला दाखल केला जाणार आहे. आयातदार व शीतगृह मालक यांच्यामध्ये करारनामा झालेला नसतानाही बेकायदेशीररीत्या खाद्यपदार्थाचा साठा करण्यात आल्याची आणखी एक गंभीर बाब या धाडीत उघड झाल्याचे काळे यांनी सांगितले.

श्री.के.एम.सोनावणे साो

सामनेवाली तर्फे ॲड.संध्या शिंदे

जाहीर नोटीस

पनवेल येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांचे न्यायालयात

विवाह अर्ज क्र.१६/२०१४

नि.नं.२६/ड

ने.ता.०६/१२/२०२२

रविकांत महादेव वाघमारे — अर्जदार

विरुद्ध

सरिता रविकांत वाघमारे — सामनेवाला

प्रति,

श्री.रविकांत महादेव वाघमारे
रा.अक्षता अपार्टमेंट, प्लॉट नं.१४४/२,
तळमजला, रुम नं.१, मारुती मंदिराजवळ,
नवेल, ता.पनवेल, जि.रायगड

ज्याअर्थी सदरचे अर्जदार यांनी मे.३ रे सह. दिवाणी न्यायाधिश क.स्तर पनवेल यांच्या न्यायालयात सदरचे प्रकरण दाखल केले आहे.

त्याअर्थी असे जाहीर करण्यात येते की, सदरहू विवाह अर्जामध्ये उपनिर्दिष्ट अर्जदार श्री.रविकांत महादेव वाघमारे रा.अक्षता अपार्टमेंट, प्लॉट नं.१४४/२, तळमजला, रुम नं.१, मारुती मंदिराजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांच्यावर प्रत्यक्ष नोटीसची बजावणी नसल्यामुळे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत. तरी सदर अर्जदार अगर त्यांचे प्रतिनिधी त्यांची बाजू मांडण्यासाठी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत किंवा दिनांक ०६/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपनिर्दिष्ट प्रकरणी सामील होवून आपले लेखी म्हणणे नोंदवावे आणि तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, सदरहू मुदतीत आपले लेखी म्हणणे न आल्यास न्यायालय सामनेवालाचे म्हणणे ऐकून प्रस्तुतच्या अर्जात निकाल देण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.०७ माहे नोव्हेंबर सन २०२२ रोजी आमच्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

सोनावणे साहेब

अर्जदारातर्फे वकील
विवेक सदाशिव तावडे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१५४०/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.२०/१२/२०२२

१) श्री.विलास बळवंत कांबळे
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
बी.डी.डी.चाळ नं.-८६, रुम नं.५७,
धोंडीराम नारायण वाक्रीकर मार्ग,
साने गुरुजी मैदान समोर, वरळी मुंबई-४०००१८
२) श्री.यश विलास कांबळे
वय : २१ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
शिव सह्याद्री, सी-३१, रूम नं.१२, सेक्टर २४,
जुईनगर, नवी मुंबई-४००७०५ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै. वंदना विलास कांबळे यांचे निधन दि.३१/०७/२०२२ रोजी शिवसह्याद्री, सी-३१, रुम नं.१२, सेक्टर-२४, जुई नगर, नवी मुंबई-४००७०५ येथे झाले आणि अर्जदार क्रं.१) श्री.विलास बळवंत कांबळे, वय : ५५, व्यवसाय : नोकरी, बी.डी.डी.चाळ नं.८६, रुम नं.५७, धोंडीराम नारायण वाक्रीकर मार्ग, साने गुरुजी मैदान समोर, वरळी, मुंबई-४०००१८, २) श्री.यश विलास कांबळे, वय : २१, व्यवसाय : शिक्षण, शिव सह्याद्री, सी-३१, रुम नं.१२, सेक्टर-२४, जुई नगर, नवी मुंबई-४००७०५ यांनी या कोर्टात सदर मयत वंदना विलास कांबळे यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळवण्यासाठी अर्ज केलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील (स्थावर मिळकती) सदनिका क्र.९०३, नववा मजला, सिलिकॉन रेसिडेन्सी, प्लॉट-२२, सेक्टर-२०, कळंबोली, ता.पनवेल येथे ३२.३१ चौ.मी. कार्पेट + ५.८५ चौ.मी. फ्लोवर बेड + २.५० चौ.मी.टेरेस

कै.वंदना विलास कांबळे यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत सबब अर्जदार सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.८/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : वलप, ता.पनवेल, जि.रायगड येथील रेव्हेन्यू रेकॉर्डमध्ये खालील प्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे मालक श्री.संजय जयकिसन उर्फ जयकिशन नोगजा यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी व हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : वलप, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत

गटक्रमांक व उपविभाग / सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर	भोगवटादाराचे नांव	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पैसे
२२/२	श्री.संजय जयकिसन उर्फ जयकिशन नोगजा	०-१४-७० पो.ख. ०-००-०० एकूण ०-१४-७०	१४७.०

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचे कोणत्याही प्रकारचे तारण, गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरदीखत, भाडेकरूपणाचा हक्क, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळककतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०६/११/२०२२

सही/-
ॲड.रोहिदास हरी आगलावे
शॉप नं.३, जयनारायण बिल्डींग, गावदेवी मंदिराजवळ, राम गणेश गडकरी मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२०६
मो.नं.७९७७९६७२०८

कोर्ट मा.एन.आर.इंदलकर साहेब

अर्जदारातर्फे वकील ॲड.जगदीश ठाकूर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी साहेब प्रथमवर्ग यांचे कोर्टात

क्रिमिनल चौकशी अर्ज नं.९५६/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.२५/११/२०२२

श्रीमती.यशोदा विष्णू वाघ
वय : ५५ वर्षे, धंदा : शेती
रा.कातकरी वाडी, वाकडी, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकडी,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार हे रा.कातकरीवाडी, वाकडी, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमस्वरुपी रहिवाशी आहे. अर्जदार यांचे पती कै.विष्णू पदू वाघ यांचा मृत्यू दि.१७/०९/२०१७ रोजी मौजे : कातकरी वाडी, वाकडी, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी नैसर्गिक मृत्यू झालेला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेले आहे. अर्जदार यांचे पती कै.विष्णू पदू वाघ यांच्या मृत्यूची नोंद कुठेच करण्यात आलेली नाही. तसा दाखला ग्रामपंचायत वाकडी, ता.पनवेल, जि.रायगड यांनी दिलेला आहे. याबाबतचा दाखला अर्जदार या मे.कोर्टात दाखल करीत आहेत. अर्जदार यांचे पती कै.विष्णू पदू वाघ यांच्या मृत्यूचा दाखला हा अर्जदार यांना पती कै.विष्णू पदू वाघ यांच्या मृत्यूचा दाखला हा अर्जदार यांना पती कै.विष्णू पदू वाघ यांचा वारस दाखला मिळणेसाठी आवश्यक आहे. म्हणून अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूची उशिरा नोंद करून मिळण्याबाबत संबंधित ग्रामपंचायत अधिकारी वाकडी, ता.पनवेल, जि.रायगड यांना योग्य ते आदेश देण्यात यावेत या करिता अर्जदार सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल करीत आहेत.

वरील अर्जदार हिचे वडील कै.विष्णू पदू वाघ यांचा मृत्यूचा दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास मृत्यूचा दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.५/११/२०२२ रोजी कोर्टाच्या सही-शिक्क्याने दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

मनोहरशेठ भोईर यांच्या हस्ते डोंगरी गावातील पाण्याच्या टाकीच्या कामाचे भूमिपूजन

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यातील डोंगरी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून डोंगरी गावातील पाण्याच्या टाकीचे दुरुस्तीच्या कामाचे भूमिपूजन उरण विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार तथा उद्धव बाळासाहेब ठाकरे (शिवसेना)पक्षाचे रायगड जिल्हाप्रमुख मनोहर शेठ भोईर, तसेच शिवसेना उरण विधानसभा संपर्क प्रमुख , महादेवशेठ घरत, व शिवसेना उरण तालुकाप्रमुख संतोषशेठ ठाकूर यांच्या शुभहस्ते पार पडले.

या प्रसंगी सरपंच निलेश घरत,अध्यक्ष रुपेश घरत, माजी सरपंच अनंत भगत,संजय घरत, विनोद घरत,हेमंत घरत,बाबुराव पाटील विलास बा पाटील,मंगेश घरत,वाय पी पाटील,के के पाटील,राजा घरत,किरण ज घरत,किशोर घरत,प्रविण घरत, चंद्रकांत खु ठाकूर,गणेश म्हात्रे,कार्यकर्ते व डोंगरी गावातील ग्रामस्थ उपस्थीत होते.पाण्याच्या टाकीचे काम होणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

रेल्वे स्टेशन परिसरात आढळला मृतदेह

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल ते खांदेश्वर रेल्वे स्टेशनजवळ एका व्यक्तीचा मृतदेह आढळला आहे. त्याच्या नातेवाइकांचा शोध पोलीस घेत आहेत. कुजलेल्या अवस्थेत आढळलेल्या व्यक्तीची माहिती स्टेशन मास्तरने दिली. त्यानुसार या व्यक्तीस उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी व्यक्तीला तपासून मयत घोषित केले.

मयत व्यक्ती अंदाजे ३५ वर्षांची असून उंची ५.५ फूट, अंगाने मध्यम असून त्याचे केस काळे आहेत. मनगटावर आर व्ही गोहिल असे इंग्रजीमध्ये लिहिले आहे. अंगात निळा शर्ट, नेव्ही ब्लू पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीविषयी माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे किंवा ०२२-२७४६७१२२ अथवा ९४९४९१२२९४ येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक डी. एस. बदाले यांनी केले आहे.

विवाहिता बेपत्ता

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल तालुक्यातील रोडपाली येथे राहणारी एक विवाहिता कोणास काही एक न सांगता कोठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

सौ. अनिता बबलू जैयस्वाल (वय २६) अंगाने सडपातळ ,उंची पाच फूट तीन इंच ,रंग सावळा , केस लांब व काळे , चेहरा गोल ,नाक सरळ असून तिच्या अंगात निळ्या रंगाची साडी व निळ्या रंगाचा ब्लाउज घातलेला आहे.

या महिले बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे पोलीस नाईक जे. पी. पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड येथील मुळ मालक / भोगवटाधारक श्री.सुनील खंडू हात्रे, रा.मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड यांचे हिश्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडून कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक / भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरिता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड

अ.क्रं.	भूधारणा पद्धती	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी.	आकार (रु.पै)
१	२	२२	२	००.४५.१० पो.ख. ०.०५.४०	८.८२
वरील एकूण क्षेत्र ००.४५.१० पो.ख.०.०५.४० एकूण ००.५०.५० गुंठे पैकी सुनील खंडू म्हात्रे यांचे शिल्लक क्षेत्र ००.२५.५० गुंठे खरेदी करावयाचा विषय आहे.					

तरी वर नमूद जमिनीवर / मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक श्री.सुनील खंडू म्हात्रे यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत गृहीत धरुन त्याप्रमाणे सदरहू मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमिनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत, असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दिनांक : ०६/११/२०२२

सही/-

श्री.समाधान आबासाहेब काशिद

वकील उच्च न्यायालय

ऑफिस नं.३, तळमजला, एकदंत को.ऑप. सोसायटी, भूखंड क्रं.९९, सेक्टर नं.२२, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९

मो.नं.९०९६३९९०२०

लालपरीचा श्वास घोटतोय, सरकार कधी लक्ष देणार

महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या एसटीच्या योजना कागदावरच

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

महाराष्ट्राची लाल-परी म्हणजे सर्वसामान्य लोकांचा व ग्रामीण भागाचा कणा आहे.. लोकांच्या घरी आज २ व्हीलर, ४ व्हीलर आल्या, खाजगी बस सेवा देखील आज मोठ्या प्रमाणावर उपलब्द आहेत. पण आजही सर्वसामान्य लोकं अगदी विश्वासाने लालपूरीतूनच प्रवास करतात. पण प्रवाशांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असलेल्या एसटीचा कणा मोडतोय की काय अशी आज परिस्थिती आहे. एसटी मधील धोकादायक प्रकार सातत्याने समोर येतोय. एसटी सेवेत काही सकारात्मक बदल केल्यास एसटीच्या उत्पन्नात दुपटीने वाढ होणार आहे. मात्र प्रवाशांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असलेल्या एसटी चा कणा मोडतोय की काय अशी परिस्थिती दिसून येतेय. सर्वसामान्य जनतेला प्रवासासाठी एसटी चा मोठा आधार आहे. मात्र अनेकदा याच एसटी चा प्रवास सुखकर व सुरक्षित होणेंऐवजी धोकादायक होताना दिसतोय. जुन्या एसटी बस प्रवासासाठी असुरक्षित असल्याची बाब अनेकदा समोर आलीय. लालपरीचा श्वास घोटत असताना सरकार कधी लक्ष देणार... असा सवाल उपस्थित होतोय.

आता पाली सुधागड़ च्या विद्यार्थ्यांची एसटी अभावी ग़ैरसोय होतेय. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या एसटी च्या योजना कागदावरच असून अग्निशमन यंत्र निरुपयोगी , प्रथमोपचार पेटी गायब तर वायफाय सेवा बंद झाल्याचे दिसते. आपत्कालीन परिस्थितीत अपघातसमयी उपयोगी पडावी यासाठी एस्टीमध्ये ठेवण्यात आलेल्या प्रथमोपचार पेट्या एस्टीतून गायब झाल्या आहेत. त्याचप्रमाणे आगीसारख्या संकटसमयी अत्यावश्यक असलेली अग्निशामक यंत्रणाही अनेक बसमधून गायब झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित व्हावा, यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने (एसटी) गाजावाजा करून सुरू केलेल्या अनेक योजना केवळ कागदावरच राहिल्याचे दिसून येत आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबाग मुरूड, रोहा, महाड, माणगाव, रामवाडी, कर्जत ,पाली आगरातून लांब पल्ल्यांच्या शेकडो बस दररोज धावतात. एस टी च्या तिकिटाचे दर सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला परडवणारे असल्याने तसेच एसटीचा प्रवास सुरक्षित असल्याचा विश्वास प्रवाशांमध्ये असल्याने एसटी मधून प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. परिणामी रायगड जिल्ह्यातील आगार हे इतर आगाराच्या तुलनेत चांगले उत्पन्न मिळविते. मात्र, प्रवाशांच्या सेवेसाठी सदैव तत्पर हे ब्रीद वाक्य घेऊन धावणाऱ्या एस्टी महामंडळाकडून प्रवाशांना आवश्यक त्या सुविधा देण्यात येतात का, महामंडळ खरोखर प्रवाशांच्या जिवाची किती काळजी घेते, हा प्रश्न उपस्थित होत आहे. दुर्गम भागात एसटी कधी पोहचते तर कधी पोहचत देखील नाही, एसटी मधून उत्पन्न अधिक मिळत असले तरी एसटी ची दुरावस्था पाहुन शासन नागरिकांच्या जीवाशी खेळतोय का? असा सवाल उपस्थित होतोय.

प्रवासादरम्यान आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास बसमधील प्रवाशांना तातडीने प्रथमोपचार मिळावेत, या उद्देशाने प्रत्येक एसटीमध्ये प्रथमोपचार पेट्या बसविण्यात आल्या आहेत. यामध्ये ड्रेसिंगसाठी मलम, कार्टन पट्टी असे साहित्य असते. चालकाच्या केबिनमध्ये ही पेटी ठेवलेली असते. काही बसमधून या पेट्या गायब झाल्या आहेत. तर काही पेट्यांमध्ये कागद किंवा इतर साहित्य ठेवण्यात आले आहे. प्रथमोपचाराच्या पेट्यांमध्ये आवश्यक साहित्यच असावे आणि त्या पेट्या सुरक्षित ठेवाव्यात, अशी अपेक्षा जनतेतुन व्यक्त करण्यात येत आहे.

कर्जत तालुका शिवसेनेची पक्षीय बांधणी आढावा बैठक संपन्न

दै.रायगड नगरी । कर्जत

कर्जत विधानसभा संपर्कप्रमुख राजेश कुचिक यांच्या उपस्थितीत कर्जत तालुका शिवसेनेची पक्षीय बांधणी आढावा बैठक नुकतीच कर्जत मध्ये संपन्न झाली

शिवसेना मध्यवर्ती कार्यालय शिवालय कर्जत येथे विधानसभा मतदारसंघातील पक्षीय बांधणी तसेच चालू राजकीय घडामोडीचा आढावा घेण्यासाठी कर्जत विधानसभा संपर्कप्रमुख राजेश कुचिक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार राजेश कुचिक, बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, मीनाताई ठाकरे यांच्या प्रतिमेला महिला संघटक सुवर्णाजोशी, आनंद दिघे यांच्या प्रतिमेला तालुका संपर्कप्रमुख सुदाम पवाळी यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. या कार्यक्रमाला विधानसभा संपर्कप्रमुख राजेश कुचिक, विधानसभा उपजिल्हाप्रमुख नितीन नंदकुमार सावंत, रायगड जिल्हा संघटक सुवर्णा जोशी, कर्जत तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, अखिल महाराष्ट्र शिवकामगार सेना प्रदेश कार्याध्यक्ष ऐहतेशाम पेणवाला, कर्जत तालुका संपर्कप्रमुख सुदाम पवाळी, कर्जत तालुका संघटक बाबू घारे, महिला तालुका संघटक करुणा बडेकर, युवासेना कर्जत तालुका सचिव ॲड. संपत हडप, उपतालुका प्रमुख दशरथ भगत, ॲड. प्रमोद सुर्वे, सुरेश गोमारे, उपतालुका संघटक पांडुरंग बागडे, सुधाकर देसाई, युवासेना उपतालुका अधिकारी किशोर दळवी, युवासेना सह समन्वयक संदीप कोळंबे, किशोर पोसाटे, जिल्हापरिषद विभाग प्रमुख, लक्ष्मण पोसाटे, कुमार बोराडे, योगेश भोईर, पंचायत समिती विभाग प्रमुख, मिलिंद सोणावले, चंद्रकांत ठाकरे, अविनाश भासे, पंचायत समिती संघटक दिनेश भासे, समीर मुलाणी, उमेश सावंत, प्रदीप देशमुख, माजी सभापती राकेश मरले त्याच बरोबर या कार्यक्रमाला कर्जत तालुक्यातील शिवसेना, युवासेना, महिला आघाडी आणि शिवसेनेच्या सर्व अंगीभूत संघटनेचे पदाधिकारी हे देखील उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सांगता अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणूकीत शिवसेनेच्या उमेदवार ऋतुजा लटके यांनी दणदणीत विजय मिळवल्याबद्दल सर्व पदाधिकाऱ्यांनी विजय उत्सव साजरा करून आनंद व्यक्त केला.

बारबालेला मारहाण

दै.रायगड नगरी । पनवेल

लीव्ह इन रिलेशनशीपमध्ये मित्रासोबत राहणे एका बारबालेला महागात पडले आहे. दोन वर्षांपासून ही बारबाला रिक्षाचालक मित्रासोबत करंजाडे वसाहतीमध्ये राहत होती. सेक्टर ६ येथील गणेश प्लाझा कॉ. प सोसायटीमध्ये या बारबालेवर मित्रानेच मारहाण केली.

मध्यरात्री इमारतीच्या वाहनतळात बारबालेला मारहाण झाल्याने तिने रिक्षाचालक मित्राविरोधात थेट पोलीस ठाणे गाठले. त्यानुसार पनवेल शहर पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार नोंदविण्यात आली आहे. मुदतशीर बशीर राऊत असे या मारहाण करणाऱ्या मित्राचे नाव असून तो पनवेल शहरातील पटेल मोहल्ला येथे राहतो. पोलिसांनी बारबालेच्या तक्रारीनंतर मुदतशीर याला नोटीस बजावली आहे. सदर बारबाला मुदतशीरला न सांगता नेरूळ येथे गेली. तिने संपर्कच केला नाही. अखेर रात्री ती घरी परतल्यानंतर संतापलेल्या मुदतशीरने तिला हाताबुक्याने मारहाण करुन शिविगाळ केली. पोलिसांनी पुन्हा तंटा न करण्याची सूचना मुदतशीरला केली आहे.

मा.गोडसे साो

प्रो.जमा. ६-२५ अर्जदाराचे वकील ॲड.दिनेश पाटील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ सतर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१५६३/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.१५/१२/२०२२

कै.करुणा आत्माराम काळण

उर्फ कमळाबाई गोपाळ भगत (मयत तर्फे वारस)

१) श्री.निखिल आत्माराम काळण

वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी

रा.विश्वास नगर, बदलापूर, पाईपलाईन रोड,

हेदुटणे, डोंबिवली (पूर्व), कल्याण, जि.ठाणे ४२१२०४ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

१) ज्याअर्थी कै.करुणा आत्माराम काळण उर्फ कमळाबाई गोपाळ भगत या दि.२७/१२/२०१९ रोजी विश्वास नगर, बदलापूर पाईपलाईन रोड, हेदुटणे, डोंबिवली (पुर्व), कल्याण, जि.ठाणे येथे त्यांच्या राहत्या घरी मयत झाल्या आहेत. त्यांच्या वडिलोपार्जित मालकीच्या शेतजमिनी मिळकती मौजे : महोदर, ता.पनवेल, जि.रायगड येथील आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे : महोदर, ता.पनवेल, जि.रायगड

अ.क्र.	मौजे	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकार रु.पै.
१	महोदर	३	-	०-०४-००	०.०९
२	महोदर	१५२	-	०-४२-०० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-४३-००	७.००
३	महोदर	१७९	१	०-१६-२०	३.७५
४	महोदर	१८०	१ अ	०-३१-५०	६.४९

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन आहे.

कै.करुणा आत्मराम काळण उर्फ कमळाबाई गोपाळ भगत यांचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हेच एकमेव वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०५/११/२०२२ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- कोर्टाचा शिक्का सही/-

क.लिपीक सहा.अधिक्षक

दि.न्याया., पनवेल दि.न्याया., पनवेल

मा.गोडसे साहेब कोर्ट

ॲड.सचिन बाबुराव कांबळे

अर्जदारतर्फे वकील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व/क.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१५७५/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.१२/१२/२०२२

१) श्रीमती.कुसूम भोपालसिंग पार्चे उर्फ पारचे

वय : ५७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी

२) श्री.विकास भोपालसिंग पार्चे उर्फ पारचे

वय : ३२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी

३) श्री.आकाश भोपालसिंग पार्चे उर्फ पारचे

वय : ३१ वर्षे, व्यवसाय : शिक्षण

वरील १ ते ३ रा.मु.परदेशी चाळ, वाल्मिकीनगर,

पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, सदरचा अर्ज हा वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार दाखल करीत आहेत. अर्जदार नं.१ यांचे पती आणि अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील स्व.भोपालसिंग रय्यत पार्चे उर्फ पारचे, हे मु.परदेशी चाळ, वाल्मिकीनगर, पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे दि.२६/०१/२००१ रोजी मृत्यू पावले आहेत.

स्व.भोपालसिंग रय्यत पार्चे उर्फ पारचे, यांचे कायदेशीर वारस खालील प्रमाणे :-

अ.नं.	वारसांचे नांव	मयताशी नाते	पत्ता
१	श्रीमती.कुसूम भोपालसिंग पार्चे उर्फ पारचे	पत्नी	पनवेल
२	श्री.विकास भोपालसिंग पार्चे उर्फ पारचे	मुलगा	पनवेल
३	श्री.आकाश भोपालसिंग पार्चे उर्फ पारचे	मुलगा	पनवेल

२) अर्जदार नं.१ यांचे पती आणि अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील स्व.भोपालसिंग रय्यत पार्चे उर्फ पारचे हे भनिनि क्रमांक-०१८५०३१७ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (पुर्वीचे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ) मध्ये दि.२६/०२/१९८६ रोजी (मध्यान्हपूर्व) अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था विभाग पनवेल अंतर्गत २२० के.व्ही.आपटा उपकेंद्र येथे सफाई कामगार या पदावर कार्यरत होते.

३) स्व.भोपालसिंग रय्यत पार्चे उर्फ पारचे हे मयत झाले असून वरील अर्जदार हे वर उल्लेख केलेल्या वंशावळीप्रमाणे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. स्व.भोपालसिंग रय्यत पार्चे उर्फ पारचे यांच्या कामाच्या जागी वरील वारसांपैकी कोणा एकाला नोकरी मिळण्याकरिता कार्यकारी अभियंता अउदा (संवसु) विभाग, कार्यालय पनवेल ह्यांनी दि.२७/०६/२०२२ रोजी दिलेल्या पत्रावरुन वारस दाखल्याची आवश्यकता आहे समजले आहे. सबब अर्जदारांनी वारस दाखला मिळणेकरिता सदर चौकशी अर्ज नं.१५७५/२०२२ मे.कोर्टात दाखल केला आहे.

तरी अर्जदार यांच्या वारस हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर अर्जदार स्व.भोपालसिंग रय्यत पार्चे उर्फ पारचे यांच्या वारस पत्रास हक्कदार असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.७ नोव्हेंबर २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- कोर्टाचा शिक्का सही/-

क.लिपीक सहा.अधिक्षक

दि.न्या.व./क.स्तर, पनवेल दि.न्या.व./क.स्तर, पनवेल

मा.मुजावर साहेब

ॲड.शेखर खोपकर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.१३८१/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.२१/११/२०२२

१) हलीमा मोहम्मद युसूफ पटेल

वय : ७६ वर्षे, धंदा : गृहिणी

२) जैनाब महम्मद नूर पटेल

वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी

३) झुबेईर मोहम्मद युसूफ पटेल

वय : ४६ वर्षे, धंदा : व्यापार

४) फातीमा आरिफ पटेल

वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी

५) महम्मद जैद मोहम्मद युसूफ पटेल

वय : ४३ वर्षे, धंदा : व्यापार

६) सुमैया इंतीयाझ पटेल

वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी

७) हाजीरा मोहम्मद नूर पटेल

वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी

रा.सुग्रा अपार्टमेंट, फ्लॅट नं.८,

दुसरा मजला, पटेल मोहल्ला, एम.जी.रोड,

पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड

८) जुनैद मोहम्मद युसूफ पटेल

वय : ३८ वर्षे, धंदा : व्यापार

क्र.१ ते ६ व ८ सर्व रा.तळोजा पाचनंद,

ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती, अर्जदार क्र.२ ते ८ यांचे वडील मोहम्मद युसूफ अब्दुल गफूर पटेल हे दि.०२/०८/२०२२ रोजी मयत झाले आहेत. मृत्यूसमयी मयत मोहम्मद युसूफ अब्दुल गफूर पटेल यांच्या नावे असलेल्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतींचे वर्णन

मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड

यु.के.नं.	स.नं.	हि.नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)
तळोजा पाचनंद २९५+२९४+६६	३७	१३	०-०५-७
	३६	७	०-४९-८
	४०	०	१-९३-२
	४४	१	०-२१-०
	३९	१	१-५६-०
	३७	४ क	०-४८-०
	३७	२+७ अ	०-४९-२
	३७	१ अ	०-७०-५
	३६	८	०-२०-०
	३७	४ ड+६ ब+८	०-२१-५

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज मयत मोहम्मद युसूफ अब्दुल गफूर पटेल यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल हे सर्व कळावे.

ही नोटस आज दि.०७/१०/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

सही/- कोर्टाचा शिक्का सही/-

क.लिपीक सहा.अधिक्षक

दि.न्या.व.स्तर, पनवेल दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

थंडीचा हंगामात खाडी किनाऱ्यांवर विविध पक्षांचे झाले आगमन

दै.रायगड नगरी । पनवेल

थंडीचा हंगाम सुरू होताच खारघरमधील खाडी किनाऱ्यांवर विविध पक्ष्यांचे आगमन होते. यंदा थंडी अद्याप सुरू झाली नसली तरी पक्षी दाखल होण्यास सुरुवात झाली आहे.

किनाऱ्यावरील उबदार वातावरणासोबत मुबलक अन्नामुळे स्थलांतरित पक्ष्यांच्या नवीन हंगामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे खाडी किनाऱ्यांवरील पक्षीप्रेमींची वर्दळ वाढली आहे. निसर्गरम्य परिसर असलेल्या खारघरच्या खाडीच्या जलाशयात उत्तर अमेरिका, युरोप, उत्तर आशिया,



नेपाळ, तिबेट, लडाख आदी देश-विदेशीपक्ष्यांची रेलचेल असते. दरवर्षी जानेवारी-फेब्रुवारी या थंडीच्या महिन्यात खारघर येथील सेक्टर १७ मधील संजीवनी विद्यालयाच्या समोरील कांदळवने, सेक्टर पंचवीस ते सत्तावीस खारजमीन, पाणथळ परिसरात आणि खाडीकिनाऱ्यावर देशविदेशातील स्थलांतरित पक्षी खाद्याच्या शोधात येत आहेत. याशिवाय खारघरमधील डोंगरावरदेखील या पक्ष्यांचा वावर आहे. यात सध्या गोल्डन प्लोव्हर, कॉमन सँडपिपर, सॅण्ड प्लोव्हर, वुडसँडपिपर, कॉमन कुकू, वेडा राघू, सोन चिखल्या, रेड बुलबुल, कॉमन किंगफिशर, पॅसिफिक गोल्डन प्लोव्हर, दाबील, सरग्या, शेकाट्या असे विविध पक्षी प्रामुख्याने दिसून येत आहे. खारघरमधील डोंगराची रांग, माळरान, खार जमिनी, पाणथळ जागा आणि कांदळवन आदी परिसर पक्षीप्रेमींसाठी सध्या पर्वणी ठरत आहे. त्यात खारघरमधील ज्योती नाडकर्णी, नरेश चंद्रसिंग आणि तरंग सरीन यांनी देखील पक्ष्यांचा हा किलबिलाट कॅमेराबद्ध आहे. गेली तीन वर्षे ही मोहीम सुरू असून पन्नासहून अधिक केली प्रजाती आश्रयाला येत असल्याचे दिसून आले.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते समग्र रायगड कॉफी टेबल बुकच्या ई-बुकचे उद्घाटन संपन्न

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर ई-फ्लिपिंग बुक नागरिकांकरिता विनामूल्य उपलब्ध

दै.रायगड नगरी । अलिबाग

राज्याचे उद्योग मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.श्री.उदय सामंत यांच्या शुभहस्ते जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या समग्र रायगड या कॉफी टेबल बुकच्या ई-बुक चे अनावरण जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग येथे संपन्न झाले. आजपासून हे कॉफी टेबल बुक नागरिकांकरिता https://raigad.gov.in/samagraraigad/ येथे विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

यावेळी आमदार भरत गोगावले, महेंद्र थोरवे, महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अपर पोलीस

अधीक्षक अतुल झेंडे व जिल्हा प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

हे कॉफी टेबल बुक तयार करण्यासाठी जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप व मीडिया आर अँड डी चे श्री.दिलीप कवळी यांचे विशेष सहकार्य लाभले असून कॉफी टेबल बुकचे ई- फ्लिपींग बुक तयार करण्याकरिता राष्ट्रीय सूचना व विज्ञान केंद्राचे वरिष्ठ तांत्रिक संचालक श्री.चिंता मणि मिश्रा, अपर जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी निलेश लांडगे, संगणक अभियंता श्रीकांत नवाळे, प्रतिष भोर व योगेश कराड यांनी विशेष परिश्रम योगदान दिले आहे.

जिल्ह्यातील प्राचीन लेणी, गड किल्ले, समुद्रकिनारे, वॉटर स्पोर्ट्स, धरणे, बंदरे, धबधबे-गिरीस्थाने, अभयारण्य, ऐतिहासिक-धार्मिक स्थळे अशा पर्यटन स्थळांसोबतच उद्योग-कारखाने, स्थानिकांच्या सक्षमीकरणासाठी नाविन्यपूर्ण योजना, पर्यटकांसाठी मार्गदर्शक नकाशे, अशा उपयुक्त माहितीचे संकलन असलेल्या जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या समग्र रायगड - पर्यटन, पर्यावरण, सक्षमीकरण या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन नुकतेच मुख्यमंत्री ना.श्री.एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री ना.श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि राज्याचे उद्योग मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत तसेच राज्याचे मुख्य सचिव मनूकुमार श्रीवास्तव, रायगड जिल्हाधिकारी तथा प्रभारी कोकण विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या उपस्थितीत मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे संपन्न झाले होते.

पत्नीच्या प्रेम संबंधांतून पतीने केली आत्महत्या

दै.रायगड नगरी । पनवेल

कामोठेतील एका नवविवाहितेने प्रेमसंबंधात अडथळा ठरणाऱ्या पतीला प्रियकराच्या मदतीने मानसिक त्रास दिल्याने पतीने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेनंतर कामोठे पोलिसांनी नवविवाहिता व तिच्या प्रियकराविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील तपासाला सुरुवात केली आहे.

या घटनेतील मृत पतीचे नाव पलाश रघुवंश बिरेंद्रप्रताप सिंग (३१) असे असून तो कामोठेत राहत होता. त्याचा विवाह आग्रा येथे राहणाऱ्या आयुशीसोबत झाला होता. तिचे आग्रा येथील अविलकुमार मौर्यासोबत प्रेमसंबंध असताना तिने घरच्यांच्या आग्रहामुळे पलाशसोबत विवाह केला होता. कामोठेत पतीसह राहून ती प्रियकरासोबत फोनवरून चॅटिंग करत होती. ही माहिती पलशला समजल्यानंतर त्याने तिला समजावण्याचा प्रयत्न केला होता. मात्र तो तिला आवडत नसल्याचे व त्याच्यासोबत राहणार नसल्याचे तीने सांगितले होते. तिच्या प्रियकरानेही आयुशीसोबत त्याचे संबध कायम राहणार असल्याचे सांगितले होते. तसेच पलाशला जिवे ठार मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर आयुशीने आपल्या प्रेमसंबंधातील अडथळा दूर करण्यासाठी पलाशच्या डोक्यात बियरची बाटली मारुन त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. पत्नी व तिच्या प्रियकराकडून सतत मानसिक छळ होत असल्याने पलाशने घरी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या घटनेनंतर पलाशच्या वडिलांनी कामोठे पोलिसांकडे आयुशी व तिचा प्रियकर अवीलकुमार मौर्या या दोघांविरोधात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा प्राथमिक तपास करून या दोघांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात राष्ट्रीय एकात्मता शिबिराचा सांस्कृतिक कार्यक्रम व पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

दै.रायगड नगरी । पनवेल

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स,कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात दिनांक २९ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत ८ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन मुंबई 'अ' ग्रुप आणि राष्ट्रीय छात्रसेना संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

हे शिबीर राष्ट्रीय पातळीवर असून यामध्ये भारतातील महाराष्ट्र आणि ओडीसा राज्यांतील विविध जिल्ह्यातून एन.सी.सी.चे ६५० कॅडेटस सहभागी झाले होते. १० दिवस चाललेल्या या शिबिरात रमाकांत नवघरे यांनी सायबर गुन्हेगारी या विषयावर व्याख्यान दिले. तसेच व्यक्तीमत्व विकास या विषयावर डॉ.दिवाकरन पिल्लई यांनी व्याख्यान दिले. याचबरोबर कर्नल नवीन शर्मा यांनी खाकी वर्दी की लष्करी जीवन या विषयावर व्याख्यान दिले. तसेच सैन्यदलातील रोजगाराच्या नवनवीन संधी या विषयावर कर्नल विक्रम सिंग यांनी व्याख्यान देवून कॅडेटसना मार्गदर्शन केले. मयूर पलांडे आणि त्यांचे सहकारी यांनी स्वसंरक्षण या विषयावर प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले.

त्याचबरोबर मुंबई दर्शन भेट या उपक्रमा अंतर्गत कॅडेटसनी नेव्हल डॉकयार्ड, गेटवे ऑफ इंडिया, मुंबई विद्यापीठ इ. मुंबईतील प्रसिद्ध ठिकाणांना भेट दिली. या शिबिरात व्हॉलीबॉल, खो-खो, समूह नृत्य, गायन, समुहगायन, राष्ट्रीय एकात्मता स्पर्धा, इ.स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याचबरोबर इस्पातर्फे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर सुद्धा आयोजित केले होते. सांस्कृतिक कार्यक्रम पारितोषिक वितरण समारंभ जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव मा.डॉ. एस.टी. गडदे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. हे शिबिर आयोजित केल्याबद्दल ब्रिगेडियर सी. मधवाल यांनी चांगू काना ठाकूर आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.के. पाटील यांचे सन्मानचिन्ह देवून आभार मानले आणि कॅम्प कमांडंट, कर्नल नवीन शर्मा यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचेही सन्मानचिन्ह देवून आभार मानले.

या शिबिरासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, कॅप्टन प्रो.डॉ.उद्धव भंडारे, सी.टी.ओ. निलीमा तिदार, सर्व शाखा विभाग प्रमुख व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशासाठी बहुमुल्य कार्य केले. या शिबिराचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल माजी खासदार व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी.देशमुख, सचिव डॉ. एस.टी.गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

माणगावांत आढळलेला विचित्र जीव ; प्रत्यक्षात होता मात्र बेडूक

दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव

आपल्या पैकी आजवर कुणीही पाहिला नसेल असा माणगांवच्या उतेखोल येथिल वाकडाई मंदिराकडे जाणाऱ्या निवांत रस्त्यावर आढळला एक विचित्र जीव.

सकाळचे वेळी ग्रामदैवत देवी वाकडाई दर्शनासाठी गेलेले स्वीकृत नगरसेवक हेमंत(बंड्या) शेट हे आपल्या दूचाकी वरुन जात असताना त्यांचे गाडी समोर एक ताडगोळ्याच्या आकाराचा कासवा समान दिसणारा जीव रस्त्यालगतच्या जंगल परिसरात रेंगाळताना दिसला. वरुन जांभळट मातकट लालसर रंगाचा हा जिव पहाताच त्यांना कुतुहल वाटले, भितीही वाटली कधिही न पाहिलेला हा जीव कासवासारखा सरकत होता. त्याच्या जवळ जाताच त्यांने आपले डोके, पाय शरिराच्या आतील भागात लपवले. आपले वहान थांबवुन हे काय हे पहाण्यासाठी त्यांनी जवळ जाऊन निरखुन पाहीले असता हा जिव आणखी वेगाने सरकु लागला. जवळची एक काडी उचलुन तिच्या सहाय्याने त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला व लागलीच येथील वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर याला फोन करून याची माहिती सांगितली.

शंतनुही तात्काळ तिकडे निघाला तोपर्यंत तो पळुन जावु नये म्हणुन जवळ पडलेली एक प्लास्टिकची पिशवी घेऊन तिचे तोंड या प्राण्याच्या दिशेला धरले असता तो या पिशवीत शिरला. त्याला उचलून हेमंत शेठ हे शंतनुच्या घरी आले. पिशवी उघडून पाहताच हे कासव नसून आत मध्ये दूर्मिळ बेडूक वाटत असल्याचे शंतनुने त्यांना सांगितले. त्याची माहिती मिळवली, एखाद्या फुग्या प्रमाणे तो आपले शरीर फुगवतो म्हणून त्याला बलुन फ्रॉग, फुग्यासारखा बेडुक म्हणून ओळखले जाते अशी माहिती शंतनुने दिली आहे. याला पाहताच बेडका सारखा फुगु नकोसं नाहीतर फुटशील! या म्हणीची आठवण व्हावी असा जीव पाहुन अनेकांनी कुतुहल व्यक्त केले आहे.

कासवा प्रमाणे डोके छोटे चार पाय व कासवाप्रमाणेच तोंड लपविण्याची कला यामध्ये दिसुन येत असुन एखाद्या सुमो पेहलवानासारखादेखील तो दिसतो याला शंतनुने उतेखोल परिसरात सुरक्षित सोडुन दिले आहे. बेडुक प्रजाती मध्ये वेगवेगळ्या आकाराचे बेडुक पहायला मिळतात यामध्ये चांद किंवा चामटी बेडकी गावाकडील घरांमध्ये भिंतीवरही पटकन उडी मारुन बसते. जवळ जाताच आपले संरक्षण करण्यासाठी आपले अंगावर पाणी सदृश द्रव(लघवी) उडवुन आपली सुटका करुन घेणारी बेडकी आपण पाहतो. तसेच पावसाळ्याचे सुरुवातीला डरावं डरावं आपले गालजवळील फुगा फुगवुन ओरडणारे बेडुक आपण पहातो. पण असा हा बेडूक क्वचितच नजरेस पडत असल्याचे येथिल ग्रामस्थांनी सांगितले आजवर असा बेडुक मात्र पाहिला नसल्याचे अनेकांनी म्हटले आहे.

हा बेडूक मुख्यतः जमीन पोखरून राहत असल्यामुळे सहसा माणसाच्या नजरेस पडत नाही व जमिनीखाली जवळपास वर्षभर काहीही न खाता-पिता जिवंत राहू शकतो, पावसाळ्याच्या सुरुवातीला प्रजनन काळातच हे बेडूक दिसून येतात आणि जमिनीत राहत असले तरी ते पाण्यातही तरबेजपणे पोहोतात, त्यांचे मुख्य अन्न मुंग्या आणि वाळवी असल्याची माहिती शंतनु कुवेसकर यांनी दिली आहे.

शेतकरी वर्ग झाला बेजार ; मजुरीचे दर कडाडले

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

चालू पावसाळी हंगामात परतीच्या पावसाने तयार भातशेतीचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाल्याने अगोदरच शेतकरी वर्ग संकटात सापडला असतानाच आता कुठे पाऊस थांबून शेतीचे कापणी बांधणीचे कामास सुरुवात करीत असतानाच मजुरीचे दर मोठ्या प्रमाणावर वाढल्याने शेतकरी वर्ग बेजार झाला आहे.

भारत देश कृषीप्रधान देश असल्याने येथील शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून आहे.त्यामुळे कधी सुका दुष्काळ,कधी ओला दुष्काळ तर कधी अन्य नैसर्गिक संकटे यांचा सामना करीत आपला शेती व्यवसाय सांभाळला जात आहे.त्यातच कधी कधी भातशेती व अन्य शेती पिके जोमदार आली असतानाच काहीतरी नैसर्गिक आपत्ती ओढावून शेती व शेतकरी वर्गाला नुकसानीचे कारण ठरत आहे. त्यातच भातशेतीबरोबरच नाचणी व वरीची पिके वाया गेली आहेत.दिवसेंदिवस वाढत चालेली महागाई व शेतीक्षेत्रासाठी लागणारी अन्य सामुग्री,खते,बी-बियाणे यांचे वाढते दर पाहता अगोदरच शेती व्यवसाय करणे परवडत नाही. त्यातच आता मजुरीचेही दर गगनाला भिडले असल्याने शेती करावी की नाही याच विचारात शेतकरी वर्ग पडला आहे.या वर्षीच्या पावसाळी हंगामात भातशेती लायक पाऊस पडल्यामुळे शेतीही जोमदार पिकली होती.परंतू ऐन कापणी बांधणीचे हंगामात परतीच्या पावसाने आपला मुक्काम वाढविल्याने शेतीक्षेत्राचे फार मोठे नुकसान झाले आहे.

वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावर रिफ्लेक्टर व पांढरे पट्टे मारले

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

वाकण पाली खोपोली राज्य महामार्ग ५४८ (अ) रुंदीकरणाचे बहुतांश काम मार्गी लागले आहे. मात्र नवीन डांबरी व सिमेंटच्या रस्त्याला दोन्ही बाजूने पांढरे पट्टे तसेच रिफ्लेक्टर नसल्याने हा रस्ता असुरक्षित झाला होता. याबाबत माध्यमांनी बातमीच्या माध्यमातून ऑगस्ट महिन्यात लक्ष वेधले होते. त्यानंतर पावसाळा संपल्यावर एमएसआरडीसी प्रशासनाने या मार्गावर दोन्ही बाजूला पांढरे पट्टे मारण्यास सुरुवात केली आहे.

पांढरे पट्टे व रिफ्लेक्टर नसल्याने रात्री व पावसामुळे वाहन चालकांना रस्त्याचा अंदाज येत नव्हता. त्यामुळे अपघाताचा धोका संभवत होता. रिफ्लेक्टर व पांढरे पट्टे नसल्याने या मार्गावर काही छोटे मोठे अपघात सुद्धा झाले होते. मात्र आता पांढरे पट्टे व रिफ्लेक्टर लावण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू झाल्याने वाहनचालक व प्रवासी यांनी समाधान व्यक्त केले आहे.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक श्रीमती.मंजुला दिलसुखराय जोशी यांचेकडून आमचे अशिलाने कायम खरेदीने घेण्याचे ठरविले आहे. सबब सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करून घेण्यासाठी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

''दिल लाभ'' बंगला, भूखंड क्र.९, रोड नं.४, सेक्टर क्र.१, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई ४१०२०६

वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, वारसहक्क, वहिवाट हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, मृत्यूपत्र, पोटगी, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीमधील नमूद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावे. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क, हितसंबंध नाहीत अथवा असल्यास त्यांनी तो सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असा गृहीत धरुन, आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत ह्यांची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०७/११/२०२२

सही/-
ॲड.प्रमोदिनी सावंत
ॲडव्होकेट हायकोर्ट (एल.एल.बी.)
ए-२०४, शांतीवन प्लॉट-३७/ई,
सेक्टर ०४, खारघर पनवेल-४१०२१०
मो.नं. ७६६६६२०४३४

इंदलकर साहेब कोर्ट
ॲड.अनिता पाटील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.नं.२१९/२०२२
ने.ता.१९/१२/२०२२

सौ.माधुरी महेंद्र कोळी
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.साई प्रसाद को.हौ.सो.ई-४,
१-१, महात्मा स्कूल जवळ, से.८,
खांदा कॉलनी, पनवेल-रायगड अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड सामनेवाला

ज्याअर्थी कै.हरिश्चंद्र मंगळ्या कोळी यांचा मृत्यू दि.०३/११/२०१४ रोजी मौजे : साई प्रसाद को.हौ.सो., ई-४, १-१, महात्मा स्कूल जवळ, से.८, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे म्हणून अर्जदार यांनी या न्यायालयात सदर कै.हरिश्चंद्र मंगळ्या कोळी यांचे मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकामी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर कै.हरिश्चंद्र मंगळ्या कोळी हे वर नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही, तर सदर न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.७/११/२०२२ रोजी दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्याया., पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया., पनवेल

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल सौ.वर्षा धर्मेंद्र पाटील व इतर यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली शेतजमीन मिळकत त्यांचे विद्यमान मालक / कब्जेदार विक्रांत परशुराम व इतर यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

जमीन मिळकतीचे वर्णन
मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड

मौजे	स.नं.	हि.नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
चिरनेर	४९	४/अ/५	००.१०.४० पैकी ००.०६.५०	१.५०

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यास येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/११/२०२२
स्थळ : उरण

सही/-
ॲड.उदय प्रकाश मोकल
अे-६३, रुम नं.१०, सेक्टर-१,
जेएनपीटी कॉलनी, द्रोणागिरी नोड,
ता.उरण, जि.रायगड
मो.नं.९०८२९११९१३